"तो"

काळोख दाटला, सारे आले अंधारून ॥
त्याच्या येण्याची चाहूल, धरा गेली हरखून ॥

झडे नभाचे चौघडे, वारा वाहे आनंदून ॥
तो येणार म्हणून, वीज गेली लकाकून ॥

पाने झाडांची डोलती, अशी टाळ्या वाजवून ॥
"तो आला का?" पुसती, आणि जाती शहारून ॥

दिनकर झाकोळला, गेल्या सावल्या विझून ॥
त्याचे स्वागत करण्या, गेल्या दिशा हरवून ॥

वारा झोंबे गार गार, कसे आले शहारून ॥
त्याने मृद्गंध धाडिला, कुठेतरी बरसून ॥



— वर्षा आठवले.